प्रकरण ५ वे

# सारांश, निष्कर्ष
# व
# शिफारशी

# प्रकरण ५

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

## ५.१ संशोधनाचा सारांश :

### ५.१.१ प्रस्तावना :

प्रकरण ४ मध्ये संशोधिकेने सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमाचे व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे आशय विश्लेषण करून अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यांच्यातील सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच संशोधनाशी संबंधित मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून अर्थनिर्वचन केलेले आहे. अन्वयार्थातून संशोधनाशी संबंधित निष्कर्ष काढलेले आहेत. या प्रकरणात मिळालेल्या निष्कर्षातून सर्वसाधारण निष्कर्ष काढून शिफारशी केल्या आहेत. शिवाय पहिल्या चार प्रकरणांचा सारांश या प्रकरणात घेतला आहे. या प्रकरणात शिफारशी करून पुढील संशोधनाशी काही विषयही संशोधिकेने सुचविलेले आहेत.

शिक्षण प्रक्रियेतील ध्येये, उद्दिष्टे, अभ्यासक्रम व अध्यापनपध्दती या गोष्टी महत्वाच्या आहेत आणि ही ध्येये व उद्दिष्टे, अभ्यासक्रम अध्यापन पध्दती सामाजिक बदलानुसार बदलत असतात. कालमानानुसार, गरजेनुसार अभ्यासक्रम रचनेत बदल होतो. अभ्यासक्रम बदलला की त्यानुसार तयार होणारी पाठ्यपुस्तके बदलतात. पण ह्या बदलांचा सैद्धांतिक दृष्ट्या अभ्यास प्रत्येक शिक्षकांनी करणे अपेक्षित आहे. सन २००६ चा अभ्यासक्रम हा कौशल्याधिष्ठित असून ही कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न खरोखरच भाषेच्या पाठ्यपुस्तकांतून होतात का? पाठ्यपुस्तकांमधून अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पूर्ण होतात का? याचा अभ्यास करणे संशोधिकेला गरजेचे वाटते

म्हणून संशोधिकेने प्रस्तुत संशोधन केले. प्रस्तुत संशोधन समस्येचे विधान पुढीलप्रमाणे निश्चित केले आहे.

## समस्येचे विधान :

"सन २००६चा महाराष्ट्र राज्याचा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या भाषेच्या पाठ्यपुस्तकातील संबंधाचा शोध घेणे".

## पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :

१. सन २००६चा महाराष्ट्र राज्याचा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम.
२. इ.५वीची भाषांची पाठ्यपुस्तके.
३. संबंधाचा शोध घेणे.

## प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निर्धारीत केली आहेत :

१. सन २००६च्या प्राथमिक स्तरावरील इ.५वीच्या भाषांच्या अभ्यासक्रमाचे विश्लेषण करणे.
२. इ.५वीच्या मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे [illegible] विश्लेषण करणे.
३. इ.५वीच्या हिंदी भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे [illegible] विश्लेषण करणे.
४. इ.५वीच्या इंग्रजी भाषेच्या पाठ्यपुस्तकाचे [illegible] विश्लेषण करणे.
५. सन २००६च्या प्राथमिक स्तरावरील इ.५वीचा भाषांचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील संबंधाचा शोध घेणे.

[illegible]

प्रस्तुत अभ्यासाची गृहितके पुढीलप्रमाणे:

१. अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार पाठ्यपुस्तकांची रचना केलेली असते.

२. अभ्यासक्रम/पाठ्यक्रम यांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकांमध्ये असते.

३. अभ्यासक्रमाचे हेतू साध्य करण्याचे पाठ्यपुस्तक हे एक साधन आहे.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती :

१. प्रस्तुत संशोधनामध्ये सन २००६ च्या महाराष्ट्रातील प्राथमिक स्तरावरील भाषांच्या अभ्यासक्रमाचा विचार केला आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये सन २००६च्या प्राथमिक स्तरावरील भाषांच्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही पाठ्यपुस्तकांच्या विश्लेषणावर भर दिलेला आहे.

३. प्रस्तुत संशोधनामध्ये सर्व मराठी माध्यमांच्या शाळांसाठी तयार केलेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी या पाठ्यपुस्तकांचा अभ्यास केलेला आहे.

मर्यादा :

१. प्रस्तुत संशोधनामध्ये महाराष्ट्रातील प्राथमिक स्तरावरील केवळ इ. ५वीच्या अभ्यासक्रमाचाच विचार केलेला आहे.

२. प्रस्तुत संशोधन फक्त २००६च्याच अभ्यासक्रमाशी निगडीत आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे फक्त २००६च्या इ. ५वीच्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या भाषेच्या नवीन पाठ्यपुस्तकांशी निगडीत आहे.

४. प्रस्तुत संशोधनामध्ये केवळ मराठी माध्यमांच्या शाळांसाठी तयार केलेल्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचाच विचार केलेला आहे.

५. प्रस्तुत संशोधनात फक्त मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा शिक्षकांचा सहभाग घेतलेला आहे.

### ५.१.२ संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा :

प्रकरण दोन मध्ये संशोधिकेने विभाग 'अ' मध्ये प्रथम संदर्भ साहित्याचा आढावा घेतला आहे. त्यात विविध तज्ञांच्या अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकासंदर्भातील विचारांचा आढावा घेतला आहे.

विभाग 'ब' मध्ये संशोधन विषयाशी संबंधित संशोधनांचा आढावा घेतला आहे यामध्ये प्राथमिक स्तरापासून महाविद्यालयीन स्तरापर्यंतच्या संशोधनांचा आढावा घेतला आहे.

### ५.१.३ संशोधनाची कार्यपध्दती :

तिसऱ्या प्रकरणात प्रत्यक्ष संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधिकेने त्या कार्याशी संबंधित सर्व बाबींचा काळजीपूर्वक विचार केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक/सर्वेक्षण पद्धतीबरोबरच अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांचे आशयविश्लेषण करण्यासाठी 'आशय विश्लेषण' हे तंत्र वापरले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना म्हणून पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातील पाच तज्ञ तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील ७५ शिक्षकांची निवड सप्रयोजन न्यादर्शन पध्दतीने केली.

माहिती संकलनासाठी मतावली व पडताळासूची या साधनांचा उपयोग केला आहे. साधनांची आशयसप्रमाणता पडताळून पाहिली.

### ५.१.४ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :

प्रस्तुत प्रकरणामध्ये चार विभाग केले आहेत.

विभाग 'अ' मध्ये अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक विश्लेषणासंदर्भात तज्ज्ञांच्या मतावलीचे विश्लेषण केले आहे.

विभाग 'ब' मध्ये मतावलीच्या अनुषंगाने तज्ञांनी निश्चित केलेल्या मानकांनुसार सन २००६ च्या अभ्यासक्रमाचे व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण केले आहे.

विभाग 'क' मध्ये सन २००६ चा इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांच्या विश्लेषणाबाबत पडताळासूचीचे विश्लेषण केले आहे.

विभाग 'ड' मध्ये सन २००६ चा इ.५वीच्या भाषांचा अभ्यासक्रम व इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्या सहसंबंधाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. अर्थनिवर्चनावरून निष्कर्ष ही काढले आहेत. हे निष्कर्ष विभागानुसार पुढे दिलेले आहेत.

## ५.२ संशोधनाचे निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष विभागवार पुढीलप्रमाणे

# निष्कर्ष

## ५.२.१ विभाग 'अ' नुसार

## अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक संदर्भात तंज्ज्ञांच्या मतावलीच्या विश्लेषणानुसार निघालेले निष्कर्ष :

अ) अभ्यासक्रम :

I)उद्दिष्टे :

१. निर्धारीत उद्दिष्टे साध्य करणारा अभ्यासक्रम या मुद्द्यांसाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी ८०% तज्ज्ञांनी पूर्णत: सहमती दर्शविली आहे.

२. सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून उद्दिष्टांची निश्चिती या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% तज्ज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

३. बालकांच्या सर्वांगिण विकासास अनुसरून उद्दिष्टांची मांडणी या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी अनुक्रमे १००%, ८०%, १००% तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

४. उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी अनुक्रमे १००%, ८०%, १००% तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

II)आशय :

५. विद्यार्थी विकासस्तरानुसार आशय या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

६. आशयातील विविधता व लवचिकता या मुद्द्यासाठी मराठीसाठी ८०%, हिंदीसाठी ८०%, इंग्रजीसाठी १००% तज्ञ पूर्णत: सहमत आहे.

७. संख्येपेक्षा गुणवत्तेवर भर देणारा आशय या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

८. राष्ट्रीय मूल्ये व गाभा घटकांवर आधारित आशय या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी साठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

९. संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आशय या मुद्द्यासाठी, मराठी, हिंदी इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

१०.माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशय या मुद्यासाठी मराठी, १००%, हिंदी ८०%, आणि इंग्रजी १००%, पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

११.व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%,तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

१२.विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कृतीशीलतेला वाव देणारे उपक्रम या मुद्द्याठी मराठी १००%, हिंदी ८०%, तर इंग्रजीसाठी तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

१३.विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनावर भर देणारे उपक्रम या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, व इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञांनी पूर्णत: सहमती दर्शविली आहेत.

१४.आनंददायी व मनोरंजक उपक्रम या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%. तज्ज्ञानी पूर्णत: सहमती दर्शविली आहेत.

१५.भाषिक कौशल्यावर आधारित उपक्रम या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, व इंग्रजीसाठी प्रत्येक १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

मूल्यमापन :

१६.मूल्यमापनासंदर्भात योग्य मार्गदर्शन या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% तज्ज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदविली आहे.

१७.निरंतर व सर्वकष मूल्यमापन या मुद्द्यासाठी मराठी ८०% हिंदी ८०%, इंग्रजीसाठी १००% तज्ज्ञांनी सहमत अशी मते नोंदविली आहेत.

ब)पाठ्यपुस्तके :

I) पाठ्यपुस्तकांचे बहिरंग :

१८.पाठ्यपुस्तकाचे आवरण या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञांनी सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१९.पाठ्यपुस्तकाचा आकार या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी अनुक्रमे ८०%, १००%, व १००%, तज्ज्ञांनी पूर्णतः सहमत मते नोदंविली आहेत.

२०.पाठ्यपुस्तकाचे मुद्रण व कागद या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी साठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञांनी पूर्णतः सहमत मते दर्शविली आहेत.

२१.पाठ्यपुस्तकाची किंमत या मुद्द्यासाठी मराठी ८०%, हिंदी १००%, व इंग्रजीसाठी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

II)पाठ्यपुस्तकाचे अंतरंग :

२२.पाठ्यक्रमानुसार पाठ्यपुस्तके या मुद्द्यासाठी मराठी ८०%, हिंदी १००%, व इंग्रजीसाठी ८०%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२३.घटकांची मांडणी या मुद्द्यासाठी मराठी ६०%, हिंदी ८०%, तर इंग्रजीसाठी ६०%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२४.घटक मांडणीत अध्यापन सूत्रांचा वापर या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी १००%,तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२५.आशयातील अचूकता व सुसंगतता या मुद्द्यासाठी मराठी १००%, हिंदी ८०%, इंगजीसाठी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२६.गाभाघटक व राष्ट्रीयमूल्ये या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२७.प्राथमिक स्तरावरील उद्दिष्टांची पूर्तता या मुद्द्यासाठी मराठी ८०%, हिंदी १००%, व इंग्रजीसाठी ८०% तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२८.समवायतत्व या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी अनुक्रमे १००%, ८०%, व ८०%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

२९.पाठ्यपुस्तकातील भाषाशैली या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

३०.विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत आशय या मुद्द्यासाठी मराठी ८०%, हिंदी ८०%, इंग्रजीसाठी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

३१.भाषिक क्षमतांच्या विकासासाठी आवश्यक या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

३२.माहिती तंत्रज्ञान या मुद्द्यासाठी मराठी व हिंदीसाठी प्रत्येकी ६०%, तर इंग्रजीसाठी १००%, तज्ज्ञ पूर्णतः सहमत आहेत.

३३.आशय, साहित्यप्रकार व रूची या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

३४.स्वावलंबी शिक्षण व आरोग्य शिक्षण या मुद्द्यासाठी मराठी व हिंदीसाठी प्रत्येकी ८०%, तर इंग्रजी साठी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

३५.पर्यावरण शिक्षण या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

३६.वयोगटानुसार व्याकरण या मुद्द्यासाठी मराठी व हिंदीसाठी प्रत्येकी १००%, तर इंग्रजीसाठी ८०%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

३७.सामान्यज्ञान या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

३८.अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

३९.स्वयंअध्ययनासाठी, स्वयंमूल्यमापनसाठी स्वाध्याय या मुद्द्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

४०.निरंतर व सर्वंकष या मुद्द्यासाठी मराठी ८०%, हिंदी व इंग्रजीसाठी प्रत्येकी १००%, तज्ज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

## निष्कर्ष

### ५.२.२ विभाग 'ब' नुसार

अ) सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमाच्या विश्लेषणासंदर्भात निष्कर्ष

I) उद्दिष्टे :

१. सन २००६चा इ.५वीचा अभ्यासक्रम निर्धारित उद्दिष्टे साध्य करणारा आहे.

२. उद्दिष्टांची निश्चिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झाली आहे.

३. नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करून ही उद्दिष्टे मांडलेली आहेत.

४. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून ही उद्दिष्टे मांडलेली आहेत.

५. हि उद्दिष्टे भाषिक कौशल्यांवर आधारित आहेत.

६. हि उद्दिष्टे सर्वांगिण विकासास पूरक आहेत.

II)आशय

७. या अभ्यासक्रमातील आशयामध्ये विविधता व लवचिकता आहे.

८. संख्येपेक्षा गुणवत्तेवर आधारित आशय आहे.

९. या आशयामधून विविध राष्ट्रीय मूल्ये व गाभाघटकांचा परिपोष केलेला आहे.

१०.या आशयामध्ये क्रमबद्धतेचा विचार दिसून येतो.

११.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील आशयामधून संस्कृतीचे संरक्षण व संवर्धनासाठी प्रयत्न झालेले आहेत.

१२.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणावर भर आहेत.

१३.सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात माहिती तंत्रज्ञानाचा विचार केलेला आहे.

१४.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय आहे.

III)उपक्रम :

१५.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कृतीशीलतेला वाव देणारे आहे.

१६.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील उपक्रम आनदंदायी व मनोरंजक आहेत.

१७.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील उपक्रम भाषिक कौशल्यांच्या विकासावर भर देणारे आहे.

१८.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात बदलत्या समाजाच्या गरजांचा विचार करून स्तरानुसार विचार करून भरपूर उपक्रमांचा समावेश केलेला आहे.

IV)मूल्यमापन :

१९.सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या मूल्यमापना–संदर्भात योग्य मार्गदर्शन आहे.

२०.सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात निरंतर व सर्वकष मूल्यमापन पद्धतीवर भर आहे.

२१.सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सामूहिकरित्या करता येण्यासारखे प्रकल्प आहेत.

२२.प्रकल्पासाठी मूल्यमापनामध्ये १०० गुणांची तरतूर योग्य आहे. पण कोणत्याविषयाच्या प्रकल्पाला किती गुण द्यावेत याचा किंवा हे दोन प्रकल्प कोणत्या विषयासाठी याचा खुलासा नाही.

२३.सन २००६च्या अभ्यासक्रमामधील मूल्यमापनामध्ये श्रेणी पद्धतीचा स्विकार केलेला आहे.

## ब) सन २००६ च्या इ. ५वीच्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाच्या विश्लेषणा संदर्भात निष्कर्ष :

अ) मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाच्या विश्लेषणानुसार निष्कर्ष :

I) बहिरंग :

१. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षण व वयोगटास अनुसरून आहे.

२. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

३. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकातील मुद्रण वयोगटास योग्य आहे.

४. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

५. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडणारी नाही.

६. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाची बांधणी साधी आहे.

७. इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकातील चित्रे आकर्षक, सुस्पष्ट व विषयाशी सुसंगत आहेत.

II) अंतरंग:

८. सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात साहित्यप्रकारानुसार विविधता आढळते.

९. सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात आशयानुसार विविधता आढळते.

१०.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात वयोगटानुसार मर्यादीत पाठात व्याकरणाचा समावेश केलेला आहे.

११.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात विविध गाभाघटकांवर आधारित पाठांचा समावेश केलेला आहे.

१२.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणांचा समावेश केलेला आहे.

१३.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात विविध मूल्यांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

१४.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात विविध भाषिक कौशल्यावर आधारित उपक्रम दिलेले आहेत.

१५.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनासाठी, स्वयंमूल्यमापनासाठी स्वाध्याय व प्रकल्प दिलेले आहे.

१६.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञान वाढीचे पुरेसे प्रयत्न झालेले आहेत.

१७.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात समवाय तत्वाचा अवलंब केलेला आहे.

१८.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात स्वावलंबी शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, आरोग्य शिक्षण इ. वर आधारित पाठांचा समावेश कमी प्रमाणात आहे. लोकसंख्या शिक्षणाचा विचार केलेला नाही.

१९.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात आवश्यक तेथे तळटिपा, पाठपरिचय व इतर माहिती दिलेली आहे.

२०.सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांचे शब्दज्ञान वाढावे यासाठी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश वयोगटानुसार केलेला आहे.

## ब) हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकाच्या विश्लेषणानुसार निष्कर्ष

I) बहिरंग :

१. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षक व वयोगटास अनुसरून आहे.

२. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

३. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकातील मुद्रण वयोगटास योग्य आहे.

४. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकातील चित्रे आकर्षक, सुस्पष्ट, विषयाशी व वयोगटास अनुसरून आहेत.

५. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकाची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी आहे.

६. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

७. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकाची बांधणी साधी आहे ती वयोगटानुसार मजबूत हवी.

II) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग :

८. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात आशयानुसार विविधता आहे.

९. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात स्वर, व्यंजन, मात्रा, संयुक्ताक्षर यांची माहिती होण्यासाठी वर्णमालेचा समावेश केला आहे.

१०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात संख्याज्ञानावर आधारित आशय आहे.

११.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात कृतीशीलतेवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

१२.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात शब्दज्ञान वाढीचे प्रयत्न झालेले आहेत.

१३.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांचे मनोरंजन, स्वास्थलाभ व एकतेवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहेत.

१४.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

१५.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात मनोरंजन व तार्किक शक्तींचा विकास होण्यासाठी आवश्यक आशयाचा समावेश केला आहे.

१६.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केला आहे.

१७.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात बोधात्मक/मूल्यावर आधारित आशयाचे पाठ आहेत.

१८.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात साहित्यप्रकारनुसार विविधता आढळते.

१९.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात शब्दसंग्रह वाढविण्यासाठी स्वतंत्र पाठांची योजना केलेली आहे.

२०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात भाषिक कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२१.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या स्वयंमूल्यमापनासाठी, स्वयंअध्ययनासाठी स्वाध्यायांचा समावेश केलेला आहे.

## क) इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाच्या विश्लेषणानुसार निष्कर्ष

I) पाठ्यपुस्तकांचे बहिरंग

१. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षक व वयोगटास अनुसरून आहे.

२. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

३. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील मुद्रण वयोगटास अनुसरून योग्य आहे.

४. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

५. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षक व वयोगटास अनुसरून आहे.

६. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील चित्रे आकर्षक, सुस्पष्ट, विषयाशी सुसंगत आहेत.

७. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाची बांधणी साधी आहे. ती आणखी मजबूत असावी.

II) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग :

८. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात विविध आशयांच्या कथांचा समावेश केलेला आहे.

९. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील कथांव्दारे विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील कवितांमधून विविध भाषिक कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

११.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानवाढीसाठी/अवांतर वाचनासाठी 'Science Magazine' अंतर्गत विविध आशयाचा समावेश केलेला आहे.

१२.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक बनविण्यासाठी विविध प्रकारचे भाषिक खेळ दिलेले आहेत. कवितांमधून विविध भाषिक कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१३.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा परिचय व्हावा यासाठी 'Newspaper Cutting' हा उपक्रम दिलेला आहे.

१४.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषण–संभाषण कौशल्याचा विकास करण्यासाठी 'Interview' या उपक्रमाचा समावेश केलेला आहे.

१५.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रह वाढीसाठी, स्मरणशक्तीच्या विकासासाठी 'Ditto' हा उपक्रम दिलेला आहे.

१६.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांना क्रियाशील बनवून आनंददायी अध्ययन अनुभव देण्यासाठी ८ प्रकारच्या प्रकल्पांचा समावेश केलेला आहे.

१७.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया विविधांगी व्हावी यासाठी चित्रे, आकृत्या, तक्ते, नकाशे इ. कल्पक साधनांचा उपयोग केलेला आहे.

१८.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीच्या विकासासाठी योग्य ते उपक्रम दिलेले आहेत.

१९.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये भाषिक कौशल्यांबरोबरच व्याकरण घटकांचा समावेश वयोगटानुसार करण्यात आलेला आहे.

२०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये निरंतर मूल्यमापनाचे प्रयत्न झालेले आहेत.

# निष्कर्ष

## ५.२.३ विभाग 'क' नुसार

सन २००६चा इ.५वीचा भाषांचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली इ.५वीची मराठी, हिंदी, इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्या विश्लेषणासंदर्भातील पडताळासूचीच्या विश्लेषणानुसार निष्कर्ष

I) अभ्यासक्रम :

अ) उद्दिष्टे :

१. सन २००६च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीचा अभ्यासक्रम निर्धारीत उद्दिष्टे पूर्ण करणारा आहे.

२. सन २००६च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीचा अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची निर्मिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झाली आहे.

३. सन २००६च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीचा अभ्यासक्रम नजीकच्या भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेला आहे.

४. सन २००६च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे बालकांच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत.

५. सन २००६च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांची उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केला आहे.

६. सन २००६च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा/कौशल्यांचा विकास होण्याचा दृष्टीने उद्दिष्टांची मांडणी केलेली आहे.

ब) आशय :

७. सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकासस्तरानुसार आहे.

८. सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात आशयामध्ये विविधता व लवचिकता आहे.

९. सन २००६ च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीचा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर भर देणारा आहे.

१०.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमात राष्ट्रीय मूल्ये व गाभाभूत घटकांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

११.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

१२.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये आशयाच्या क्रमबद्धतेचा विचार केलेला आहे.

१३.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन सुधारना प्रोत्साहन देणारा आशय आहे.

१४.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

१५.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय दिलेला आहे.

१६.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर भर देणारा आशय आहे.

क) उपक्रम :

१७.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कृतीशिलतेला वाव देणाऱ्या उपक्रमांचा समावेश अभ्यासक्रमात आहे.

१८.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये आनंददायी व मनोरंजक उपक्रम आहेत.

१९.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामधील उपक्रम विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनावर भर देणारे आहेत.

ड) मूल्यमापन :

२०.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये मूल्यमापनासंदर्भात योग्य मार्गदर्शन आहे.

२१.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये निरंतर व सर्वंकष मूल्यमापनावर भर आहे.

२२.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये श्रेणी पध्दतीचा स्वीकार योग्य आहे.

२३.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सामूहिकरित्या व वैयक्तिकरित्या करता येण्यासारखे प्रकल्प आहेत.

२४.सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमामध्ये प्रकल्पांच्या मूल्यमापनासाठी दिलेली १०० गुणांची तरतूद योग्य आहे.

II) पाठ्यपुस्तके

अ) बहिरंग :

१. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी पाठ्यपुस्तकांचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ दोन्ही आकर्षक आहेत.

२. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ छापताना वयोगटाचा विचार केला आहे.

३. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांची बांधणी मजबूत नाही. ती वयोगटानुसार आणखी मजबूत हवी.

४. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील अक्षरांचा आकार सुस्पष्ट व योग्य आहे.

५. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

६. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी आहे.

७. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांसाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

८. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये योग्य तेथे चित्रे, नकाशा व आकृत्यांचा वापर केलेला आहे.

ब)पाठ्यपुस्तकांचे अंतरंग :

९. सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीची पाठ्यपुस्तके पाठ्यक्रमानुसार आहेत.

१०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये दहा गाभाभूत घटक व राष्ट्रीय मूल्ये यांचा समावेश केलेला आहे.

११.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातून प्राथमिक स्तरावरील उद्‌दिष्टे प्रतित होतात.

१२.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विविध भाषिक क्षमतांच्या विकासासाठी आवश्यक घटक आहेत.

१३.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील घटकांची मांडणी घटक पद्‌धतीने व मानसशास्त्रीय पद्‌धतीने झालेली आहे.

१४.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील घटकांची रचना सामाजिक गरजेनुसार झालेली आहे.

१५.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील घटकांची मांडणी करताना अध्यापन सूत्रांचा अवलंब केलेला आहे.

१६.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामील आशयामध्ये अचूकता व सुसंगतता आहे.

१७.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये दहा गाभाभूत घटक व राष्ट्रीय मूल्ये यांचा समावेश केलेला आहे.

१८.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील आशय, साहित्यप्रकार व रूची याबाबत विविधता आहे.

१९.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील भाषाशैली वयोगटास अनुसरून आहे.

२०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आशयांचा /उदाहरणांचा समावेश केलेला आहे.

२१.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानवाढीचे प्रयत्न झालेले आहे.

२२.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक बनविण्याचे प्रयत्न दिसून येतात.

२३.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये स्तरानुसार व्याकरणाचा समावेश केलेला आहे.

२४.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

२५.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये आवश्यक तेथे तळटिपा, पाठपरिचय व इतर माहितीचा समावेश आहे.

२६.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये वयानुसार संबोध/नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी, सुविचार इ. चा समावेश योग्य प्रमाणात आहे.

२७.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये सरावासाठी, स्वयंमूल्यमापनासाठी, स्वयंअध्ययनासाठी स्वाध्याय दिलेले आहेत.

२८.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये प्रकल्पांचा समावेश केलेला आहे.

२९.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये स्वावलंबी शिक्षणाचा विचार झालेला आहे.

३०.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये लोकसंख्या शिक्षणाचा विचार झालेला आहे.

३१.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये निरंतर व सर्वंकष मूल्यमापनासाठीचे प्रयत्न दिसून येतात.

३२.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी पाठ्यपुस्तकामध्ये प्रकल्पासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन केलेले नाही. फक्त इंग्रजीच्या पुस्तकात प्रकल्पासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन केलेले आहे.

३३.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये आरोग्य शिक्षणाचा विचार समाधानकारक नाही.

३४.सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये पर्यावरण शिक्षणाचा विचार झालेला आहे.

## निष्कर्ष

## ५.२.४ विभाग 'ड' नुसार

सन २००६ चा इ. ५वीचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली इ. ५वीची मराठी, हिंदी व इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्या संबंधानुसार काढलेले निष्कर्ष

i) सन २००६च्या इ. ५वीच्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टे व त्यानुसार तयार झालेले इ. ५वी चे मराठी पाठ्यपुस्तक यांच्यातील संबंधानुसार निष्कर्ष :

१. सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील श्रवण कौशल्यांतर्गत येणाऱ्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये विविध गद्य–पद्य पाठांचा समावेश केलेला आहे.

२. सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील भाषण–संभाषण क्षेत्रात येणारी उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून अतिशय कमी प्रमाणात मजकूर दिलेला आहे. तसेच शिक्षकांनी अशाच प्रकारचे मजकूर तयार करून विद्यार्थ्यांच्या भाषण–संभाषण कौशल्यांचा विकास व्हावा असे अपेक्षित आहे.

३. सन २००६च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील वाचन क्षेत्रातंर्गत येणारी उद्‌दिष्टे पूर्ण व्हावीत यासाठी पाठ्यपुस्तकातून स्वतंत्र मजकूर प्रमाणात मजकूर दिलेले आहेत.

४. सन २००६च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील लेखन क्षेत्रांतर्गत दिलेली उद्‌दिष्टे पूर्ण व्हावीत यासाठी पाठ्यपुस्तकात पुरेसे प्रयत्न केलेले आहे.

५. सन २००६च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील 'कार्यात्मक व्याकरण' क्षेत्रात दिलेली उद्‌दिष्टे पूर्ण व्हावीत यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये कार्यात्मक व्याकरणाचा समावेश वयोगटास अनुसरून केलेला आहे.

ii) सन २००६च्या इ. ५वीच्या अभ्यासक्रमातील उद्‌दिष्टे व त्यानुसार तयार झालेले इ. ५वी चे हिंदी सुलभभारती पाठ्यपुस्तक यांच्यातील सहसंबंधानुसार निष्कर्ष :

६. सन २००६च्या इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात श्रवण क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्‌दिष्टांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकात पडलेले दिसून येते.

७. सन २००६च्या इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात भाषण–संभाषण क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून पुरेसे प्रयत्न झालेले दिसून येतात.

८. सन २००६च्या इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात वाचन क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी योग्य प्रयत्न पाठ्यपुस्तकातून झालेले आहेत.

९. सन २००६च्या इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात लेखन क्षेत्राच्या अंतर्गत दिलेली उद्दिष्टे पूर्ण होण्यासाठी पाठ्यपुस्तकातून योग्य ते प्रयत्न झालेले आहेत.

१०. सन २००६च्या इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात भाषाप्रयोग क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून व्याकरणाचा समावेश पुरेशा प्रमाणात आहे.

ii) सन २००६च्या इ. ५वीच्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टे व त्यानुसार तयार झालेले इ. ५वी चे इंग्रजी पाठ्यपुस्तक यांच्यातील संबंधानुसार निष्कर्ष :

११. सन २००६च्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात श्रवण क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून पुरेसे उपक्रम दिलेले आहेत.

१२. सन २००६च्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात भाषण–संभाषण क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी यासाठी पाठ्यपुस्तकात विविध कृतींचा समावेश केलेला आहे.

१३.सन २००६च्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात वाचन क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पाठ्यपुस्तकात योग्य अशा आशयाचा समावेश केलेला आहे.

१४.सन २००६च्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात लेखन क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी पाठ्यपुस्तकात योग्य उपक्रम व स्वाध्यायांचा समावेश केलेला आहे.

II) आशय व उपक्रम :

१५.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी अभ्यासक्रमामध्ये श्रवण, वाचन व लेखन कौशल्यांतर्गत दिलेल्या क्षमता विकसित करण्यासाठी पाठ्यपुस्तकांमध्ये विविध उपक्रम दिलेले आहेत.

१६.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी अभ्यासक्रमामध्ये सांगितल्याप्रमाणे पाठ्यपुस्तकामध्ये व्याकरणविषयक उपक्रम दिलेले आहेत.

१७.सन २००६च्या इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये अपेक्षित उपक्रमांचा समावेश पाठ्यपुस्तकांमध्ये करण्यात केलेला आहे.

१८.सन २००६च्या इ. ५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमामध्ये अपेक्षित उपक्रमांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे.

II) मूल्यामापन :

१९.सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमानुसार इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये मूल्यमापनाचा अवलंब केला आहे.

## ५.३ सर्वसाधारण शिफारशी :

१. व्दितीय भाषा हिंदीसाठी आठवड्यातून ४ तासिका दर्शविलेल्या आहेत. पण मराठी व इंग्रजीप्रमाणेच ७ तासिका असणे आवश्यक आहे.

२. इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात चित्रांची रंगसंगती आकर्षक असावी. इ. ५वीच्या अभ्यासक्रमात मूल्यमापनासंदर्भात आणखी स्पष्ट व सुबोध मार्गदर्शन हवे.

३. या अभ्यासक्रमात प्रकल्पासंदर्भात योग्य व पुरेसे मार्गदर्शन हवेव.

४. इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे आवरण आणखी आकर्षक व टिकाऊ हवे.

५. इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांची बांधणी मजबूत असावी.

६. इ.५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील भाषण–संभाषण कौशल्यासाठी अगदी कमी उपक्रम आहेत, ते आणखी जास्त असावेत.

७. इ. ५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील पाठांतून सर्व गाभाघटक व राष्ट्रीय मूल्ये यांचा परिपोष होणे आवश्यक आहे.

८. इ. ५वीच्या हिंदी च्या पाठ्यपुस्तकातील पाठांची संख्या वयोगटानुसार मर्यादित असावी.

९. इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये आरोग्य शिक्षण, व्यवसायशिक्षण, माहिती तंत्रज्ञान व लोकसंख्या शिक्षण यावर आधारित आणखी पाठांचा समावेश व्हावा.

१०. तिन्ही पाठ्यपुस्तकात पाठपरिचय व लेखक परिचय देणे आवश्यक आहे.

११. इ.५वीच्या मराठी व हिंदीच्या पाठ्यपुस्तकातील चित्रे रंगीत व आकर्षक असावीत. रंगसंगती योग्य हवी.

१२.इ.५वीच्या मराठी व हिंदी, व इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात एकाच आशयाचे अनेक पाठ आहेत. तर त्यात विविधता असणे आवश्यक आहे.

[illegible]

[illegible]

१५.बदलत्या सामाजिक गरजा व नजीकच्या भविष्याचा विचार करून नवीन अध्यापन पध्दती, तंत्रे, मूल्यमापन पद्धतींचा अवलंब करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणावा.

## ५.५ पुढील संशोधनासाठी विषय :

१. प्राथमिक स्तराबरोबरच इतर स्तरावरील अभ्यासक्रम व इतर पाठ्यपुस्तके यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास अशाप्रकारे करता येईल.

२. दोन स्तरावरील अभ्यासक्रमांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

३. कोणत्याही विषयाच्या जुन्या व नव्या अभ्यासक्रमांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

४. कोणत्याही विषयाच्या जुन्या व नव्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या पाठ्यपुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

५. नव्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या कोणत्याही दोन विषयांच्या पाठ्यपुस्तकांचा तुलनात्मक अभ्यास करता येईल.

## समारोप :

संशोधिकेने आपल्या संशोधनात सन २००६ चा महाराष्ट्र राज्याचा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली इ. ५वीची मराठी, हिंदी, इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत प्रकरणात या संशोधनाचा थोडक्यात सारांश दिला आहे. शिवाय काही निष्कर्षाचा उहापोह केला आहे. निष्कर्षावरून शिफारशी सुचविल्या आहेत. या संशोधनाप्रमाणे अन्य संशोधनाच्या दृष्टीने काही संशोधन क्षेत्रेही सुचविली आहे.